# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. करोना 2020/ प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 15/03/2020.

5. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. करोना 2020/ प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 15 मार्च 2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 15/03/2020.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 1, 2 व 3 चे अनुषंगाने उपरोक्त वाचा क्र. 4 चे या कार्यालयाचे आदेशान्वये करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा, खाजगी शिकवण्या/कोचिंग क्लासेस, अंगणवाड्या तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था दि. 31 मार्च 2020 पर्यंत बंद ठेवण्यास आदेशित केले आहे.**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 5 अन्वये मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांनी असे सूचित केले आहे की, राज्यात ब-याच प्रमाणात मोठ्या शैक्षणिक संस्था ह्या महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्राच्या परिघाबाहेर ग्रामीण क्षेत्रात मोडतात परंतु या संस्था नागरी क्षेत्राला लागून आहेत. तसेच मोठ्या शैक्षणिक संस्थामध्ये निवासी विद्यार्थी वसतीगृहे ही आहेत त्याचबरोबर या शैक्षणिक संस्थामध्ये दैनंदिन स्वरुपात शहरी व ग्रामीण भागातून विद्यार्थी येत जात असल्याने या ठिकाणी कोविड विषाणूचा प्रादुर्भाव होण्याची दाट शक्यता असल्याने अशा महानगरपालिका/नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्रालगतच्या जवळपास असलेल्या अशा मोठ्या शैक्षणिक संस्था दि. 31 मार्च 2020 पर्यंत बंद ठेवण्यात याव्यात.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उपरोक्त वाचा क्र. 5 मधील सूचनांचे अनुषंगाने करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व मोठ्या शैक्षणिक संस्था ज्या नगरपालिका/नगरपंचायत क्षेत्राच्या परिघाबाहेर ग्रामीण क्षेत्रात मोडतात परंतु या**



Scanned by CamScanner

संस्था नागरी क्षेत्राला लागून आहेत अशा सर्व मोठ्या शैक्षणिक संस्था तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व मोठ्या शैक्षणिक संस्था ज्या संस्थांमध्ये निवासी विद्यार्थी वसतिगृहे ही आहेत त्याचबरोबर या शैक्षणिक संस्थांमध्ये दैनंदिन स्वरुपात शहरी व ग्रामीण भागातून विद्यार्थी येत जात असतात अशा सर्व मोठ्या शैक्षणिक संस्था दि. 31 मार्च 2020 पर्यंत बंद ठेवणेबाबत आदेशित करीत आहे.

तथापि उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्राप्रमाणेच या क्षेत्रात येणा-या शैक्षणिक संस्थांच्या इयत्ता 10 वी व इयत्ता 12 वी च्या परीक्षा तसेच विश्वविद्यालयांच्या परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात. त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधीत संस्था प्रमुखांस देण्यात याव्यात.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

-sd-

(दिपा मुधोळ-मुंडे)
जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

प्रत:- मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, उस्मानाबाद.
4. अपर जिल्हाधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा शल्य चिकित्सक, उस्मानाबाद.
6. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
7. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
8. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, उस्मानाबाद.
9. उपविभागीय अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
10. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं./ सा.प्र./ एकात्मिक बालविकास/ स्वच्छता व पाणीपुरवठा जि. प. उस्मानाबाद.
11. तहसिलदार सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. शिक्षणाधिकारी, प्राथमिक व माध्यमिक, जि. प. उस्मानाबाद.
13. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
14. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, द्वारा शासकीय तांत्रिक विद्यालय, तळमजला, उस्मानाबाद.

15/3/20

जिल्हाधिकारी, उस्मानाबाद



Scanned by CamScanner